महाराष्ट्र वन विभाग

वन विभाग

दुरध्वनी क्रमांक- (02162) 220057, 220058, 220059

Email - forest.satara68@gmail.com

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

उपवनसंरक्षक, सातारा वन विभाग, सातारा यांचे कार्यालय

"वनभवन", गोडोली वन रोपवाटीका परिसर,गोडोली, सातारा 415 001

जा.क्र. - ब/जमीन/21.22/ 517

सातारा: 415 001 दिनांक 07/06/2021.

प्रति,

श्री. एन. एस. चव्हाण,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
साईयो इन्फ्रा कोल्हापूर.

**विषय** - वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत महाप्रताप हवाई रज्जु मार्ग प्रकल्पासाठी (Ropeway) प्रस्ताव सादर करणेबाबत.

**संदर्भ** - 1. आपलेकडील पत्र क्र. 12/वन-14/रोपवे दिनांक 28/12/2020.
2. इकडील पत्र क्र. ब/जमीन/3033 दिनांक 01/03/2021.
3. आपलेकडील पत्र क्र. 33/रोपवे दिनांक 28/04/2021.

संदर्भीय पत्र क्र. १ अन्वये महाबळेश्वर ते प्रतापगड महाप्रताप रोपवेसाठी ३.७८३५ हे. वनक्षेत्र वळतीकरण करणेसाठीचा वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावाची तपासणी केली असता काही त्रुटी आढळुण आलेल्या होत्या. त्या संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये कळविण्यात आलेल्या होत्या. त्यानंतर आपलेकडील पत्र क्र. ३ अन्वये त्रुटींची पुर्तता करुन अहवाल प्रस्तावांसह या कार्यालयास सादर केला आहे.

सदर प्रस्तावांची तपासणी केली असता त्यामध्ये पुढील प्रमाणे त्रुटी आहेत.

१. सर्व प्रथम खालील स्वाक्षरीकर्ता यांचे समारे सदर प्रस्तावाचे पीपीटी स्वरुपात सादरीकरण करावे. यामध्ये रोपवे साठी लागणा-या क्षेत्राबाबत सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे. तरी याबाबतची सर्व माहितीसह सादरीकरणास दिनांक ११ जुन २०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता खालील स्वाक्षरीकर्ता यांचे दालनात उपस्थित राहावे.
२. प्रस्तावातील पार्ट एक मधील मुद्दा क्र. २ मध्ये नमुद केलेले क्षेत्राचा तपाशील चुकीचा देण्यात आलेला आहे. क्षेत्राची गणना चुकीच्या पध्दतीने केली आहे.
३. प्रकल्पासाठी लागणा-या वनेत्तर क्षेत्राचा तपशील स्वतंत्रपणे दिलेला नाही.
४. प्रस्तावातील Area Statement मध्ये बाबवार लागणा-या वनक्षेत्राचा तपशिल नकाशासी जुळुण येत नाही. त्यामध्ये विसंगती आढळुण येते.
५. प्रकल्प टिपणीमध्ये रोपवेची लांबी व लागणारे क्षेत्रामध्ये विसंगती दिसुन येत आहे. याची खात्री करावी.

६. प्रस्तावातील प्रमाणपत्र १६ मध्ये गावांची नावे नमुद केलेली नाहीत.

७. प्रकल्पासाठी वनेत्तर क्षेत्र लागणार असल्याने प्रमाणपत्र क्र. २४ मध्ये तसे नमुद करणे आवश्यक आहे.

८. प्रकल्पामुळे मौजे माल्कमपेठ, हरोशी, जावळी व कुंभरोशी गावातील वनक्षेत्र बाधीत होत आहे, परंतु मौजे जावळी या गावाचा ग्रामसभेचा ठराव जोडण्यात आलेला आहे.उर्वरित गावांचे ठराव प्रस्तावामध्ये समाविष्ठ नाहीत. (ॲग्ल भाषेत)

वरील प्रमाणे त्रुटींची पुर्तता करण्यासाठी प्रस्ताव परत करण्यात येत आहेत. तरी त्रुटीची पुर्तता करुन सुधारित प्रस्ताव या कार्यालयास सादर करावेत.

(म. ना. मोहिते.)
उपवनसंरक्षक,
सातारा वन विभाग, सातारा

सोबत - मुळ ७ प्रस्ताव

प्रत - **सहाय्यक वनसंरक्षक** (वनीकरण), सातारा यांना माहितीसाठी.
प्रत - वनक्षेत्रपाल, महाबळेश्वर यांना माहितीसाठी व नोंद घेणेकामी.

2/- आपलेकडील संदर्भीय पत्र क्र. 3 अन्वये सादर केलेल्या अहवालानुसार असे कळविले आहे की सदर प्रस्तावित वनक्षेत्रात 187 वृक्षांची तोड करावी लागणार आहे. तरी सदर वृक्षतोडीचे अंदाजपत्रक व तोड करावी लागणा-या वृक्षांची शास्त्रीय नावासह घेरी प्रमाणे यादी या कार्यालया सादर करावी. (आँग्ल भाषेत दोन्ही सादर करावे)
तसेच मौजे चतुरबेट व पारपार येथील मा. स. नं. ७९/१, ७९/२, ७९/३ व ३४ मधील क्षेत्र पर्यायी वनीकरणास योग्य असलेबाबत चे प्रमाणपत्र (आंग्ल भाषेत) सादर करावे. तसेच जागेचा नकाशा, गावाचे नाव, सं. नं. जीपीएस पॉलिगॉन, केएमएल फाईल व सदर क्षेत्राची माहिती व वनीकरणासाठी वापरण्यात येणा-या रोप लागवडीचे मॉडेल नुसार १० वर्षाची पर्यायी वनीकरणाची अंदाजपत्रके (आंग्ल भाषेत) या कार्यालयास ७ दिवसात अहवाल सादर करावा. (५ प्रतीत)